Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार
१९.०५.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १०८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### गंभीर आजारी आणि धोकादायक कुत्र्यांना मारण्यावर विचार व्हावा

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** - देशभरात सातत्याने वाढणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांवर आणि डॉग बाइटच्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने आज (१९ मे २०२६) महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

'देशात लहान मुले आणि वृद्धांना कुत्रे चावत आहेत, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही,' असे स्पष्ट करत सुप्रीम कोर्टाने 'गंभीर आजारी आणि मानवांसाठी धोकादायक ठरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना मारण्यावर प्रशासनाने विचार करावा,' असे थेट निर्देश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सविस्तर सुनावणी घेत सर्व राज्यांना फटकारले आहे.

## काटकसर करा! सरकारी बँका, विमा कंपन्यांना अर्थ मंत्रालयाचे आदेश

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नवी दिल्ली*** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर, अर्थ मंत्रालयाने सोमवारी सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्थांना काटकसरीचे उपाय अवलंबण्याचे आणि इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्याचे आवाहन केले आहे.




गेल्या आठवड्यात, पंतप्रधानांनी नागरिकांना इंधनाचा न्याय्य वापर करणे, सोने खरेदी आणि परदेश प्रवास पुढे ढकलणे यासारख्या उपाययोजनांचे आवाहन केले होते, जेणेकरून अर्थव्यवस्था मजबूत करता येईल. केंद्र सरकार लोकांना पश्चिम आशियातील संघर्षाच्या प्रतिकूल प्रभावापासून वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, यावर भर दिला होता. अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या वित्तीय सेवा विभागाने सार्वजनिक क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्या, वित्तीय संस्थांना जारी केलेल्या परिपत्रकात प्रवासा-वरील खर्च कमी करण्याचे आणि इलेक्ट्रिक वाहने स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. काटकसरीचे उपाय तातडीने लागू केले जातील, असे वित्तीय सेवा विभागाने या परिपत्रकात म्हटले आहे.

विशेष गरज असल्याशिवाय सर्व बैठका, आढावा आणि सल्लामसलत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारेच केली जावी, असे यात नमूद करण्यात आले आहे. बँका आणि वित्तीय संस्थांचे अध्यक्ष, एमडी, सीईओ आणि पूर्णवेळ संचालकांचे परदेश प्रवास विहित मर्यादेपेक्षा कमी ठेवले जावेत आणि अशा कार्यक्रमांना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थिती लावली जावी, असेही म्हटले आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या संदर्भात परिपत्रकात म्हटले आहे कि, सर्व संस्थांनी त्यांच्याद्वारे भाड्याने घेतलेल्या पेट्रोल आणि डिझेल कार शक्य तितक्या प्रमाणात इलेक्ट्रिक कारने बदलण्याचे उद्दिष्ट ठेवावे. विद्यमान वाहनांचा ताफा टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतरित केला जावा, असे यात नमूद केले आहे.

## विधान परिषदेवरुन महायुतीत मोठा 'गृहकलह'

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** - केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ विधान परिषद जागांची निवडणूक जाहीर करताच महायुतीमध्ये अंतर्गत जागावाटपावरून मोठा पेच निर्माण झाला आहे.

### कोकणच्या जागेसाठी राजन साळवी विरूद्ध तटकरे सामना

### पुण्यात राष्ट्रवादीच्या जागेवर भाजपचा डोळा



विशेषतः कोकण स्थानिक स्वराज्य संस्था आणि पुणे स्थानिक स्वराज्य संस्था या दोन जागांवरून महायुतीतील मित्रपक्षांमध्ये उमेदवारीवरून उघड चढाओढ सुरू झाली आहे. बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे जागांवर हक्क नेमका कोणाचा, यावरून वरिष्ठ पातळीवर मोठी रस्सीखेच होण्याची चिन्हे आहेत. कोकणात शिंदेंच्या शिवसेनेचे पारडे जड; तटकरेंच्या पुनर्वसनात खोडा? कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. या जागेवर शिंदेंच्या शिवसेनेकडून माजी आमदार राजन साळवी यांच्या नावाची मोठी चर्चा आहे.

राजन साळवी यांनी यापुर्वीच या निवडणुकीच्या अनुषंगाने आखणी सुरू केलीय. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे हे त्यांचा मुलगा अनिकेत तटकरे यांचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी आग्रही आहेत. मात्र, राजन साळवी यांनी या जागेवर थेट दावा ठोकला आहे.

अकोला येथे बोलताना राजन साळवी म्हणाले, 'या मतदारसंघात महायुतीत सर्वाधिक मतदार हे आमच्या पक्षाकडे आहेत. त्यामुळे ही जागा परंपरेनुसार आम्हालाच मिळायला हवी आणि हा आमचा नैसर्गिक दावा आहे. यावर आमचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे योग्य तो निर्णय घेतील.' त्यामुळे आता ही जागा नक्की कुणाच्या वाट्याला येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पुण्यात भाजप वि. राष्ट्रवादी सामना दुसरीकडे, माजी आमदार अनिल भोसले यांची २०२२ पासून रिक्त राहिलेली पुण्याची जागा स्वतःकडे राखण्याचे मोठे आव्हान अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससमोर आहे.


## पुसली धरणात एकाच कुटूंबातील तीन भावंडांचा बुडून मृत्यू

■ *(विजय चौधरी)*

***शेंदुरजनाघाट*** - रखवालीचे काम करणाऱ्या संतुलाल उईके यांच्या कुटूंबातील ३ चिमुकल्या मुला-मुलींचा येथुन ५ किलोमीटर सातनूर गावानजीक असलेल्या पुसली धरणामध्ये शेतात बुडून मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी उघडकीस आली आहे.

### काळजाचा थरकाप उडवणारी घटना : तालुक्यात हळहळ





सातनुर शेत शिवारात संतुलाल उईके हे कुटूंबासह मनोहर निमकर यांच्या शेतातील खोपडीत रखवालदार म्हणुन रहात होते. ते त्यांचे पंकज संतुलाल उईके (१०), प्रिया संतुलाल उईके (८), पवन संतुलाल उईके (७) हे मुलं काल १७ मे पासून बेपत्ता होते यांचा शोध त्यांचे वडील व इतर लोक घेत असताना आज १८ मे च्या दुपारी पुसली धरणात त्यांचे मृतदेह आढळून आले. ही तिन्ही मुले नरखेड तालुक्यातील आश्रमशाळेत शिकत असतात ते उन्हाळ्याच्या सुट्टीत आपल्या आई वडिलांकडे सातनूर येथे आले असता ते १७ मे ला सकाळपासून घरी परतले नाही, त्यानंतर संतुलाल उईके यांनी त्यांचा शोध घेतला असता ते आढळून आले नाही.

आज १८ मे च्या दुपारी १ वाजताच्या सुमारास बाजूला असणाऱ्या पुसली धरणात यांचा मृतदेह आढळून आला. यानंतर घटनेची माहिती शे.घाट पोलिसांना देण्यात आली. प्राथमिक अंदाजानुसार नुसार हे २ मुलं १ मुलगी, सातनूर गावांनजिक असणाऱ्या पुसली धरणात आंघोळ करण्यासाठी गेले असावे, असे बोलल्या जात आहे. १७ मे पासून ते घरी परतले नाही, त्यामुळे वडिलांनी त्यांचा शोध घेतला असता आज मात्र त्यांचे कपडे, धरणाच्या बाजुला कपडे आढळुन आले व बाजूला त्यांचा मृतदेह आढळुन आल्यानंतर उईके कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सद्यः परिसरात खळबळं उडाली आहे.

या घटनेने मात्र वरुड तालुक्यात सर्वत्र शोककळा पसरली असुन या घटनेचा पुढील तपास ठाणेदार दीपक महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मंगेश शेगोकार करीत आहे. दरम्यान आज दुपारच्या सुमारास घटनास्थळाचा पंचनामा करुन तिन्ही मृतदेह वरुडच्या ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनाकरीता रवाना करण्यात आले. सायंकाळच्या सुमारास तिन्ही भावंडाचे शवविच्छेदन करुन त्यांच्यावर एकाच वेळी आप्तेष्ट, स्वकीय आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने मात्र वरुड तालुक्यासह संपुर्ण जिल्हयात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

## 'आरसीसी'च्या मोटेगावकरला ठोकल्या बेड्या

### ९ दिवसांची सीबीआय कोठडी

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***पुणे*** - देशभरातील २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लावणाऱ्या 'नीट-यूजी २०२६' पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने सोमवारी मोठी कारवाई केली. लातूर आणि नांदेड येथील नामांकित आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर याला तब्बल ११ तासांच्या कसून चौकशीनंतर सीबीआयने अटक केली. त्याला नऊ दिवस 'सीबीआय' कोठडीत ठेवण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले. मोटेगावकर याची प्रवासी कोठडी मिळवण्यात आली असून, पुढील तपासासाठी त्याला तपासासाठी दिल्लीतील सीबीआय कार्यालयात नेण्यात येणार आहे.




मोटेगावकरच्या अटकेमुळे या संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे आता महाराष्ट्रातील मोठ्या शैक्षणिक माफियांशी जोडले गेल्याचे स्पष्ट झाले असून, या अटकेने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील ही एकूण दहावी अटक असून, पुण्यातून आतापर्यंत तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

सीबीआयने न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, शिवराज मोटेगावकर याच्याकडे परी-क्षेच्या १० दिवस आधीच म्हणजेच २३ एप्रिल २०२६ रोजी नीटची प्रश्नपत्रिका आणि तिची उत्तरे उपलब्ध होती. ३ मे रोजी होणारी मुख्य परीक्षा सुरू होण्यापूर्वीच त्याच्या मोबाईलवर हे प्रश्न आढळून आले होते. तपासात असेही समोर आले आहे की, त्याने ही प्रश्नपत्रिका विवेक पाटील नावाच्या व्यक्तीला आणि अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक मोबदल्यात पुरवली होती.

## परळीसाठी फडणवीसांचा मोठा निर्णय, धनंजय मुंडेंनी स्वत: भेट घेऊन आभार मानले

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***परळी*** - येथील पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित ३०१.५४ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. सोमवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत या सुधारित प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी मंत्री आणि



आमदार धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी समस्त परळी वासियांच्या व शिवभक्तांच्या वतीने आभार व्यक्त केले. श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात वाढ करून ३०१.५४ कोटींच्या सुधारित आराखड्यास मंजुरी याविषयी बोलताना धनंजय मुंडे यांनी आपल्या सोशल मीडिया माध्यमांवर पोस्ट करत या बाबत माहिती दिली. त्यात ते म्हणाले कि, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत परळी येथील पंचम ज्योतिर्लिंग श्री प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी आखण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात वाढ करून ३०१.५४ कोटींच्या सुधारित आराखड्यास मंजुरी देण्यात आली.




# राज्य सरकारचा शेतकरी कर्जमाफीचा निर्णय लांबणीवर पडणार

## विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा अडसर?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. कर्जमाफीचा निर्णय आता आणखी काही दिवस लांबवणीवर पडण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद



निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबवणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्विकृत सदस्य आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे मात्र, सर्वसामान्यपणे असे मोठे निर्णय घेण्याचे टाळले जाते, असं तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना दिलासा

## थकीत महागाई भत्ता देण्यास मंजुरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य सरकारने पाचव्या, सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगानुसार वेतन घेणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी प्रलंबित महागाई भत्त्याची थकबाकी देण्यास मंजुरी दिली. या निर्णयामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांची नोव्हेंबर व डिसेंबर २०२५ तसेच जानेवारी



२०२६ या तीन महिन्यांची थकबाकी मे महिन्याच्या वेतनासोबत मिळणार आहे.

या थकबाकीपोटी राज्याच्या तिजोरीतून सुमारे ८०० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. शासनाने निवृत्त अखिल भारतीय सेवा अधिकाऱ्यांच्या पेन्शनमध्येही दोन टक्के महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. त्यामुळे आता सेवानिवृत्त अधिकारी आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना चालू वर्षाच्या जानेवारी महिन्यापासून ६० टक्के दराने सुधारित महागाई भत्ता मिळणार असल्याचे वित्त विभागाने जाहीर केले. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी विभागाने तीन स्वतंत्र शासन निर्णय जारी केले आहेत.


# भारतावर विश्वास का ठेवावा? नॉर्वेच्या महिला पत्रकाराचा प्रश्न

## परराष्ट्र मंत्रालयाने तिथेच लोकशाहीचा धडा शिकवला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ओस्लो** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नॉर्वे दौऱ्यादरम्यान ओस्लो येथे एका पत्रकार परिषदेत जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली.

एका नॉर्वेजियन महिला पत्रकाराने भारतातील मानवाधिकार, लोकशाही आणि माध्यम स्वातंत्र्याविषयी चिंता व्यक्त करत थेट ‘आम्ही भारतावर विश्वास का ठेवावा?‘ असा खोचक प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) सीबी जॉर्ज यांनी




तब्बल १७ मिनिटांचे सविस्तर आणि सडेतोड उत्तर देत परदेशी पत्रकाराला भारतीय लोकशाहीच्या अथांग व्याप्तीची जाणीव करून दिली. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर 'विदेश मंत्रालयाचा शार्प रिप्लाय' म्हणून प्रचंड व्हायरल होत आहे. सोमवारी (१८ मे २०२६) ओस्लो येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गहर स्टोर यांच्यात द्विपक्षीय बैठक झाली.

या बैठकीनंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत नॉर्वेच्या पत्रकार हेल लिंग यांनी पीएम मोदींना माध्यम स्वातंत्र्यावरून प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. पीएम मोदी पोडियमवरून जात असताना पत्रकाराने म्हटले, ‘पंतप्रधान मोदी, तुम्ही जगातील सर्वात मुक्त माध्यमांच्या काही प्रश्नांची उत्तरे का देत नाही?‘ यानंतर झालेल्या परराष्ट्र मंत्रालयाच्या विशेष प्रेस ब्रीफिंगमध्ये याच मुद्द्यावरून नॉर्वेजियन पत्रकाराने भारतीय अधिकाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. मात्र, परराष्ट्र सचिव सीबी जॉर्ज यांनी या दाव्यांची हवाच काढून घेतली.

# इंधन दरवाढीचा फटका! आता एसटीचाही प्रवास महागणार

## परिवहन मंत्र्यांचे दरवाढीचे संकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ केल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीचे आर्थिक गणित बिघडले असून संभाव्य आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी भाडेवाढीशिवाय पर्याय राहिलेला नाही. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना



दरवाढीची संकेत दिले. त्यामुळे लवकरच एसटीचा प्रवास महागणार आहे.

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. या इंधन दरवाढीचा एसटीवर होणाऱ्या परिणामाचा आढावा घेण्यासाठी सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी तर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.

# संतापाचा कडेलोट! बुलढाण्यात इंधन टंचाईचा सहावा दिवस, शेतकऱ्यांची रात्र पेट्रोल पंपावर, दरवाढीनंतर पेट्रोल-डिझेलच्या टंचाईचं भयावह चित्र

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाचा परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर होताना दिसत आहे. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती भडकल्या असून भारतातही शुक्रवारी (१५ मे) पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली होती.

त्यानंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे.

दरवाढीचे आर्थिक संकट उभं राहिलं असतान दुसरीकडे राज्यातील अनेक जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा तुडवडा जाणवत असून बहुतांश पंपावर इंधन भरण्यासाठी मोठ्या रांगा लागल्याचे चित्र आहे. तर अनेक पंपावर पेट्रोल आणि डिझेल उपलब्ध नसल्याने ग्राहकांचा मनस्ताप




बघायला मिळतो आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेलचा गंभीर तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. अशातच बुलढाण्यात इंधन टंचाईचा सहावा दिवस असून शेतकऱ्यांनी अक्षरशः पेट्रोल पंपावर जागून रात्र काढली आहे. बुलढाण्यात इंधन टंचाईचा सहावा दिवस, शेतकऱ्यांनी पेट्रोल पंपावर जागून रात्र काढली बुलढाणा जिल्ह्यात अभूतपूर्व अशी इंधन टंचाई निर्माण झाली आहे आणि याचा फटका थेट आता शेतकऱ्यांना बसू लागला आहे.

डिझेल मिळत नसल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत. लवकरच मान्सूनच आगमन होणार आहे आणि त्यापूर्वी शेतीची कामे आटोपून शेतकरी पेरणीच्या तयारीला लागणार आहे. मात्र ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याने सहाव्या दिवशीही शेतकरी व वाहनधारकांनी पेट्रोल पंपावर रांगेत रात्र काढली . मात्र तरीही डिझेल न मिळाल्याने अनेक शेतकरी संतप्त झाले आहेत. काल रात्री जिल्ह्यातील १६६ पेट्रोल पंपांपैकी फक्त २२ पेट्रोल पंपांवर डिझेल उपलब्ध होतं. मात्र प्रत्येक ठिकाणी मोठी रांग व गर्दी असल्याने अनेकांना डिझेल मिळू शकले नाही व त्यांचा नंबर येईपर्यंत डिझेल संपलं. यावर सरकारने लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी आता शेतकरी करत आहेत.

# सुनील तटकरे मुख्यमंत्र्यांच्या भेटीला

## * कारण गुलदस्त्यात : वरिष्ठ नेते फडणवीसांना भेटत असल्यामुळे राष्ट्रवादीत नाराजीची चर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – खासदार सुनील तटकरे यांच्या पदावरून राष्ट्रवादीत संभ्रम असल्याचं चित्र असतानाच एक मोठी घडामोड घडली आहे. सुनील तटकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीचं कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. तर धनंजय मुंडे यांच्या भेटीनंतर आता सुनील तटकरे यांनीही मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यामुळे राष्ट्रवादी पक्षात नाराजीचा सूर असल्याची चर्चाही आहे.

काही दिवसांपूर्वी पार्थ पवार यांनीही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. आता खासदार सुनील तटकरे यांनीही वर्षा या निवासस्थानी



मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. राष्ट्रवादीत सुरू असलेल्या घडामोडी, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जाहीर झालेल्या निवडणुका या पार्शवभूमीवर भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. राष्ट्रवादीत सर्वकाही आलबेल नाही राष्ट्रवादीच्या अध्यक्षा आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला एक पत्र लिहिलं होतं. त्यामध्ये सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्या नावासमोर त्यांच्या पदाचा उल्लेख नव्हता. त्यामुळे सुनील तटकरे हे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आहेत की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर अलिकडच्या काळात सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि पटेल-तटकरे यांच्यामध्ये सुंदोपसुंदी असल्याच्या चर्चा आहेत. सुनेत्रा पवारांच्या गुवाहाटी दौऱ्यानंतर सुनील तटकरे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यानंतरही या चर्चा पुन्हा सुरू झाल्याचं दिसून आलं.

# बेपत्ता मुलीच्या शोधासाठी कुटुंबाच्या विनवण्या, पोलीसांचा गजब तर्क, म्हणाले ‘गाडीत डिझेल नाही’, नागपुरातील ‘त्या’ अधिकाऱ्यावर कारवाई होणार, पालकमंत्र्यांचे आदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नागपूर** – नागपूरच्या पाचपावली पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षकाचा धक्कादायक प्रकार पुढे आला आहे. अल्पवयीन बेपत्ता मुलीला शोधण्याची विंनती करणाऱ्या पालकांना दिलेल्या पोलिसांच्या उत्तराने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. 'वाहनात डिझेल नाही? तर शोधणार कुठे? पैसे द्या शोधतो' असे धक्कादायक उत्तर चक्क वर्दीतल्या पोलीस निरीक्षकाने दिले आहे. या संवादाचा



व्हिडीओ व्हायरल झाला असून या प्रकरणानंतर राज्याचं राजकारण देखील तापलं आहे. हा विडिओ सोशल मीडियावर वायरल झाल्यांनतर काँग्रेस नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत सरकारवर टीका केलीय. एकंदरीत या प्रकरणानंतर भाजप नेते आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याची दखल घेत त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. त्यामुळे या प्रकरणी नेमकी काय कारवाई होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. नागपूर पोलिसांच्या गाडीत डिझेल नसेल तर मग इतर अत्यावश्यक सुविधांच काय?

दरम्यान, याच मुद्यावर बोट ठेवत काँग्रेस नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे. ते म्हणाले 'भाजपच्या जाहिरातींमध्ये सुरक्षित महाराष्ट्र दाखवला जातो, पण वास्तवात पोलिसांकडे बेपत्ता झालेली मुलगी शोधायला डिझेलसुद्धा नाही? राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांचे हजारो कोटींचे इव्हेंट, सेल्फी, प्रचार आणि पीआरसाठी पैसा आहे, पण नागरिकांच्या सुरक्षेसाठी नाही? मग ते बाईकवरून प्रवास केल्याचा काय उपयोग झाला? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटकसर करण्याचे आवाहन केले ते पोलिसांनाही लागू केलं का? मुली बेपत्ता असताना सुद्धा डिझेल वाचवणे महत्वाचे वाटते का? गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात ही अवस्था असेल तर संपूर्ण राज्याचे काय?' असा प्रश्न काँग्रेस नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

# संपादकीय

स्वप्ने तेव्हाच पूर्ण होतात,
जेव्हा मेहनत त्यांच्यासोबत असते.

## 'नीट'चा अट्टाहास आणि गुणवत्तेचा मृगजळ: अपयशाच्या दुष्टचक्राला आळा घालण्याची गरज

वैद्यकीय शिक्ष प्रवेशासाठी देशभरात घेतल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेचा निकाल दरवर्षी लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा फैसला करतो. मात्र, गेल्या काही वर्षांतील आकडेवारीवर नजर टाकली, तर एक चिंताजनक वास्तव समोर येते. 'नीट एलिजिबल' (पात्र) होणाऱ्यांची संख्या कायम परीक्षा देणाऱ्यांच्या जेमतेम निम्मी असते. याचाच अर्थ, परीक्षा देणाऱ्या निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांना साधे पात्रता गुणही मिळवता येत नाहीत. असे असतानाही, केवळ पालकांच्या दबावापोटी किंवा समाजातील 'डॉक्टर' या नावाच्या प्रतिष्ठेसाठी नापास होणारे किंवा एलिजिबल नसणारे विद्यार्थी पुन्हा पुन्हा या परीक्षेला बसत राहतात. वर्षानुवर्षे चालणाऱ्या या अट्टाहासाला आता कुठेतरी आळा बसणे देशाच्या आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे झाले आहे. आकडेवारीचे कटू वास्तव आणि 'रिपीटर' संस्कृती दरवर्षी देशातून २० ते २२ लाखांहून अधिक विद्यार्थी 'नीट' परीक्षेसाठी नोंदणी करतात. यातील जेमतेम ५० ते ५५ टक्के विद्यार्थीच गुणवत्तेची किमान पातळी ओलांडू शकतात. उर्वरित लाखो विद्यार्थ्यांच्या हाती केवळ निराशा येते. मात्र, खरी समस्या इथूनच सुरू होते. पहिल्या किंवा दुसऱ्या प्रयत्नात अपयशी ठरलेले हजारो विद्यार्थी पुढील दोन-तीन वर्षे केवळ एकाच परीक्षेची तयारी करण्यात घालवतात. वेळेचा अपव्यय: वयाची अत्यंत महत्त्वाची आणि ऊर्जेने भरलेली २ ते ३ वर्षे विद्यार्थी केवळ एकाच प्रवेश परीक्षेच्या चक्रव्यूहात अडकून घालवतात. कोचिंग क्लासेसची चांदी: या 'रिपीटर' किंवा 'ड्रॉपर' संस्कृतीमुळे कोटा, लातूर किंवा पुणे यांसारख्या कोचिंग हबमधील क्लासेसचे खिसे भरतात, पण विद्यार्थ्यांच्या पदरी मात्र मानसिक ताण पडतो.

पालकांचा अट्टाहास आणि सामाजिक प्रतिष्ठा

मुलाने किंवा मुलीने 'डॉक्टर'च व्हावे, हा पालकांचा अट्टाहास या समस्येच्या मुळाशी आहे. अनेकदा विद्यार्थ्याची क्षमता, त्याची आवड किंवा त्याची बौद्धिक पातळी न ओळखता त्याला वैद्यकीय क्षेत्राच्या शर्यतीत ढकलले जाते. स्टेटस सिम्बॉल: समाजात डॉक्टर असण्याला मिळणारी प्रतिष्ठा आणि आर्थिक सुरक्षितता यामुळे पालकांना आपल्या पाल्याच्या अपयशाचा स्वीकार करणे कठीण जाते. क्षमतेकडे दुर्लक्ष: 'प्रयत्नाने काहीही साध्य होते' या सुविचाराचा अतिरेक करून, पात्र नसलेल्या विद्यार्थ्यालाही पुन्हा परीक्षा देण्यास भाग पाडले जाते. यामुळे विद्यार्थ्यामध्ये न्यूनगंड निर्माण होतो. मानसिक आरोग्यावर होणारा गंभीर परिणाम एकच अभ्यासक्रम वर्षानुवर्षे वाचणे, सतत तीच परीक्षा देणे आणि तरीही यश न मिळणे, यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होते. नैराश्य, प्रचंड मानसिक ताण आणि अत्यंत दुर्दैवी प्रसंगी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढतो आहे. कोटा (राजस्थान) मधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे सत्र हे याच अट्टाहासाचे आणि अपयशाच्या भीतीचे थेट परिणाम आहेत.

# समाजसेवेसाठी नोकरीचा त्याग करणारे 'समाजरत्न' भाऊसाहेब गोतमारे

विद्येने विनय, विनयाने पात्रता, पात्रतेने धन, धनाने धर्म आणि धर्माने सुख प्राप्त होते या संस्कृत सुभाषिताचा प्रत्यक्ष आदर्श म्हणजे गोतमारे गुरुकुल, शस्त्र व शास्त्र प्रशिक्षण केंद्र, सावनेर चे संस्थापक-संचालक श्री भाऊसाहेब गोतमारे.



ब्लॅक बेल्ट धारक, महाराष्ट्र तायक्कांडो कोच आणि राष्ट्रीय कोयला खदान मजदूर संघाचे माजी उपाध्यक्ष असलेल्या भाऊसाहेबांनी दीड लाखाची सरकारी नोकरी समाजसेवेसाठी लाथाडली. गेल्या १५ वर्षांपासून प्राचीन गुरुकुल परंपरेचा वारसा जपत त्यांनी सावनेर तालुक्यात ज्ञान-संस्काराची ज्योत तेवत ठेवली आहे.

दोन राष्ट्रस्तरीय पुरस्कारांचे मानकरी भाऊसाहेबांच्या कार्याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेतली गेली. 'समाजरत्न' व 'समाजसेवा शिरोमणी' या दोन राष्ट्रस्तरीय पुरस्कारांसह त्यांना 'वसुंधरा मित्र पुरस्कार'ही प्राप्त झाला आहे.

यावर्षी बागेश्वर धाम सरकार यांनी आमगाव येथे, श्री तानाजी मालुसरे यांचे वंशज श्री कुणाल मालुसरे यांनी पुण्यात किल्ले सिंहगडावर, तर नागपूरचे उपायुक्त श्री फुटाणे साहेब यांनी नागपूरला त्यांचा जाहीर सत्कार केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व आमदार डॉ.आशिष देशमुख यांनीही त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. श्री फुटाणे साहेबांनी तर त्यांच्या मासिकात गोतमारे सरांवर दोन पानांचा विशेष लेखही लिहिला.

गुरुकुलाची संकल्पना : शस्त्र + शास्त्र = सुसंस्कृत पिढी सावनेर व परिसरात गोतमारे गुरुकुलाच्या दोन शाखा कार्यरत आहेत. येथे इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे ७० हून अधिक विद्यार्थी गणित, विज्ञान व इंग्रजीचे निःशुल्क शिक्षण घेतात. विशेष म्हणजे शालेय अभ्यासक्रमासोबतच येथे 'शस्त्र व शास्त्र' या दोन्ही विद्यांचा समन्वय साधला जातो.

दुसरी शाखा खैरीपंजाबराव येथे आहे. ती खुशबूताई पिपरेवार सांभाळते. खुशबूताई समाजकार्यासोबतची तयारी ही करत आहे. विशेष म्हणजे तिने शस्त्र व शास्त्र यांचे प्रशिक्षण घेण्यासोबतच गुरुकुलात संपूर्ण भगवद्गीता मुखोद्गत केली आहे.

शस्त्र प्रशिक्षणात : तायक्कांडो, लाठी-काठी, नान-चाकू, तलवारबाजी यांसारख्या आत्मसंरक्षणाच्या कला शिकवल्या जातात. भाऊसाहेब स्वतः ब्लॅक बेल्ट व महाराष्ट्र तायक्कांडो कोच असल्याने मुलांना राष्ट्रीय पातळीवर तयार करतात.

शास्त्र प्रशिक्षणात : भगवद्गीता, हरिपाठ, हनुमान चालीसा, श्री गजानन महाराज बावन्नी, शिवतांडव स्तोत्र, रामरक्षा, गणपती अथर्वशीर्ष, वैदिक मंत्र यांचे पाठांतर केले जाते. सोबतच तबला, पेटी, टाळ, बासरी, झांज, नाल, लेझीम, अध्यात्मिक नृत्य, गरबा, भजन, कीर्तन यांसारख्या सांस्कृतिक कलांचे धडे दिले जातात. मोबाईलच्या युगात मुलांना मातीशी, संस्कृतीशी जोडणे गरजेचे आहे. आम्ही मुलांना फक्त मार्क्स नाही, तर 'माणूस' बनवतो. हातात पुस्तक असेल तर डोक्यात ज्ञान येईल, आणि हातात शस्त्र असेल तर मनात धैर्य येईल. दोन्हींचा समतोल म्हणजेच खरा भारतीय, असे भाऊसाहेब सांगतात.

विराट हिंदू महासंमेलनाचे मुख्य संयोजक यावर्षी सावनेर येथे पार पडलेल्या विराट हिंदू महासंमेलनाचे मुख्य संयोजक म्हणून भाऊसाहेबांनी जबाबदारी सांभाळली. धर्मजागृतीसोबतच समाजप्रबोधनाचे मोठे व्यासपीठ त्यांनी निर्माण केले.

त्यागातून घडलेला सेवायज्ञ सर्वात थक्क करणारी बाब म्हणजे भाऊसाहेबांनी दीड लाख रुपये पगाराची सरकारी नोकरी सोडून स्वतःला पूर्णवेळ समाजसेवेत झोकून दिले. पगारापेक्षा समाधान मोठे आहे. या ७० मुलांच्या चेहऱ्यावरचे हास्य हाच माझा पगार, असे ते नम्रपणे सांगतात.

गुरुकुलातील एक विद्यार्थी सांगतो, सरांनी आम्हाला लाठीकाठी शिकवली, पण आधी 'आई-वडिलांपुढे लाठी कधीच उचलायची नाही' हे शिकवले. गीता शिकवली, पण आधी 'कर्म करा, फळाची अपेक्षा करू नका' हे जगायला शिकवले.

वरुड येथे निःशुल्क मार्गदर्शन असे शस्त्र व शास्त्र, अध्यात्म आणि विज्ञान यांची सुंदर सांगड घालणारे समाजरत्न भाऊसाहेब गोतमारे व त्यांच्या संपूर्ण टीमने वरुड येथे निःशुल्क मार्गदर्शन केले. पालक व विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेतला व समाधान व्यक्त केले.

काळाची गरज ओळखून प्राचीन गुरुकुल पद्धतीने आधुनिक शिक्षण देणारे भाऊसाहेब गोतमारे म्हणजे चालते-बोलते विद्यापीठच आहेत. त्यांच्या कार्याला सलाम!

**बोला छत्रपती शिवाजी महाराज की जय!**


**भारत माता की जय! जय हरी!**



शेषराव नर्मदा गोपाळ कडू
मो.नं.९९२३९८८७३४, वरुड

# आनंदी देश व्हायचेय तर मोबाईल द्या फेकून!

फिनलंड सतत आनंदी देश ठरत आहे. चांगली आर्थिक स्थिती, संसाधनांचे समान वाटप, मजबूत कल्याणकारी व्यवस्था आणि उत्तम जीवनमान हे आनंदी देशांचे निकष आहेत. भारताला आनंदी देश व्हायचेय तर तरुणांच्या हातातील मोबाईल काढून घ्यायला हवा.



भारतामध्ये आनंदाची व्याख्या जेवढी भौतिक साधनांशी निगडित आहे तेवढीच ती आत्मिक, आध्यात्मिक आणि नैतिकसुद्धा आहे. जगणे याचा अर्थ केवळ जिवंत राहणे असा नसून सुखासमाधानाने आयुष्य जगणे असा होतो. त्यामुळेच संसारिक जबाबदाऱ्यांतून पूर्ण झाल्यावर संन्यस्त वृत्ती आणि आध्यात्मिक जीवन महत्त्वाचे मानले जाते. भौतिक साधने व्यवहाराची पूर्तता करण्यासाठी तेवढीच महत्त्वाची असतात. शिक्षण, आरोग्य, रोजगार, सकस आहार, पर्यावरण यांसारख्या घटकांकडे तर अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही. जागतिक आनंद निर्देशांक २०२५ नुसार आनंदी देशात भारताचा क्रमांक ११६ वा आहे. हा अहवाल युनायटेड नेशन्सच्या सहाय्याने तयार केला जातो. लोकांचे जीवन, समाधान, उत्पन्न, सामाजिक आधार, स्वातंत्र्य, भ्रष्टाचाराची पातळी इत्यादी घटकांवर आधारित क्रमांक दिले जातात. २०२५ नुसार, फिनलंड, डेन्मार्क, आईसलंड, स्वीडन, नेदरलँड्स, नॉर्वे, स्वीत्झर्लंड, लुकझेम्बर्ग, न्यूझीलंड, ऑस्ट्रिया हे दहा देश अनेक वर्षांपासून टॉपमध्ये आहेत. याचे कारण येथील नागरिकांचे जीवनमान खूप चांगले आहे. अशावेळी प्रश्न निर्माण होतो महासत्ता बनू इच्छिणाऱ्या भारताचा आनंद निर्देशांक कमी का आहे?

प्रामुख्याने, आर्थिक विषमता श्रीमंत आणि गरीब यांच्यात मोठी दरी असणे, आरोग्य व शिक्षणाच्या दर्जेदार सुविधा नसणे, तणाव आणि स्पर्धा शिक्षण, नोकरी, करिअर यामुळे ताण जास्त असणे, मोठ्या शहरांमध्ये प्रदूषित हवा आणि ट्रॅफिक समस्या असणे, सामाजिक आधार कमी असणे यांसारख्या बाबींमुळे भारताचा आनंद निर्देशांक तुलनेने कमी आहे. देशाच्या प्रगतीसाठी केवळ आर्थिक विकास पुरेसा नसून नागरिकांचे समाधान, आनंद आणि मानसिक स्वास्थ्यही तितकेच महत्त्वाचे आहे. तरुण पिढी आनंदी, आत्मविश्वासी आणि आशावादी असेल तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. एकमेकांना मदत करणे, सहकार्याची भावना ठेवणे आणि स्पर्धेपेक्षा सहकार्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांची चीन भेट : होर्मूझचे भवितव्य, आणि आपण

मागच्या शतकापासूनची पण उतरती कळा लागलेली जागतिक महासत्ता (अमेरिका) आणि दुसरी या शतकातील उभरती जागतिक महासत्ता (चीन) यांच्यात दोन दिवसापूर्वी बीजिंगमध्ये एक सहमतीनामा झाला: आपण आपल्या दोघांच्यामध्ये स्पर्धा स्पर्धा खेळत राहू; पण एकमेकांचे रक्त मात्र काढायचे नाही.

बाकी जगाचे (उदा होर्मूझ ) काय होणार ते जग बघून घेईल हा प्रस्ताव ठेवला चीनचे सर्वेसर्वा जिनपिंग यांनी. आपल्या भाषणात त्यांनी Thucydides Trap चा उल्लेख करून म्हटले की या सापळ्यात अडकायचे का याबद्दल अमेरिका आणि चीनने विचार केला पाहिजे आंतरराष्ट्रीय संबंधांचे विश्लेषण करताना या सापळ्याचा उल्लेख केला जातो. अस्तित्वात असलेल्या महासत्तेला, नव्याने ताकद कमावणाऱ्या दुसऱ्या महासत्तेने आव्हान देणे जगाच्या इतिहासात नवीन नाही. एका अभ्यासावरुन हे दाखवून देण्यात आले आहे की बहुसंख्य वेळा त्या दोघांतील स्पर्धा संघर्षाची परिणीती युद्धात होते. आणि दोघांचेही अतोनात नुकसान होते

अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची ही गेल्या नऊ वर्षातील पहिलीच चीन भेट; ती देखील चीनच्या निमंत्रणावरून झालेली नाही. तर आम्ही तुम्हाला भेट देऊ इच्छितो अशी ट्रम्प यांच्या कडून विनंती गेल्यानंतर चीनने ओके. या म्हटल्यानंतर झालेली ही भेट ( हा मुद्दा महत्वाचा आहे) मागच्या जानेवारीत ट्रम्प यांनी अनेक देशांविरुद्ध आयात कर युद्ध पुकारले, त्यात चीनला सिंगल आउट केले होते. १४५ टक्के आयात कर लावून. १४५ टक्के आयात करांना आयात कर नाही म्हणत, आयात बंदी म्हणतात हे चीनने ताडले. हा मेसेज चीनने गांभीर्याने घेतला

घेतला म्हणजे एका रात्रीत चीन गंभीर झाला असे नाही. तो दहा वर्षापासून या क्षणाची तयारी करत होता. नव्वदीच्या दशकात चीनच्या एकूण निर्यातीमध्ये अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीचा वाटा २५ टक्के होता. तो २०२५ मध्ये ट्रम्प यांनी आयात कर अस्त्र उगारले तेव्हा १० टक्क्यांवर आणला गेला होता. याला म्हणतात पूर्वतयारी. त्यामुळे ट्रम्प यांच्या अपेक्षेप्रमाणे, चीनवर फारसा गंभीर परिणाम झाला नाही चीनने मग हुकमी अस्त्र काढले. चीनमधून अमेरिकेला होणारी दुर्मिळ खनिजांची निर्यात थांबवली. अमेरिकेतील नवतंत्रज्ञान,




संरक्षण सामुग्री, बॅटरी उद्योग कासावीस झाले. त्यांनी ट्रम्प यांच्याकडे धाव घेतली कारण दुर्मिळ खनिजे वापरणारे हे उद्योग ठप्प होऊ शकले असते. या उद्योगात दुर्मिळ खनिजांना पर्याय नाही आणि जगातील उत्पादन क्षमतेपैकी ९० टक्के उत्पादन क्षमता एकट्या चीनकडे असल्यामुळे पुरवठादार म्हणून चीनला देखील पर्याय नाही ही पार्श्वभूमी होती ट्रम्प यांनी आम्ही तुम्हाला भेटायला / वाटाघाटी करायला येतो म्हणण्याची त्याला अजून एक तातडीचे परिमाण लाभले ते अमेरिकेने स्वतःचे दोन्ही हात आणि तंगड्या इराणवर हल्ला करून अडकवून घेतल्याने. ट्रम्प यांनी चीनच्या व्यापारी ताकदीला एका वर्षांपूर्वी जसे अंडर एस्टीमेट केले अगदी तसेच इराणच्या भूमिगत युद्ध तयारीला आणि चिकाटीला केले. त्यांना कळतच नाहीये हात / तंगड्या कशा सोडवून घ्यायच्या (राष्ट्राध्यक्ष कसा निवडू नये याचा मतदार नागरिकांना मोठा धडा आहे हा ) दुसऱ्या बाजूला चीन आणि इराण मध्ये आर्थिक , व्यापारी, लष्करी घनिष्ट संबंध आहेत. ट्रम्प यांनी जिनपिंग यांना प्लिज प्लिज त्या इराणला होर्मूझ मोकळी करायला सांगा सांगितले. पण चीनने कोणतेही आश्वासन न देता जिनपिंग एवढेच म्हणाले हा प्रश्न सोडवण्यात माझा काही उपयोग झाला तर मला आनंदच होईल. आंतराराष्ट्रीय संबंधात याचा अर्थ म्हणजे ठेंगा

डॉलरची सोन्याशी नाळ तोडल्यानंतर निक्सन यांचे अर्थमंत्री जॉन कोनोली म्हणाले होते डॉलर आमचे चलन आहे, पण तो तुमचा प्रॉब्लेम आहे त्याच धर्तीवर चीन न बोलता सांगत आहे इराण आमचा मित्र आहे खरा. पण इराण हा तुमचा प्रश्न आहे. तो तुम्हीच निस्तरा (एव्हाना बरेच चिनी तेल टँकर हॉर्मुझ मधून येऊ जाऊ लागले आहेत) दुर्मिळ खनिजे किती निर्यात करणार , नक्की किती अमेरिकेन शेतीमाल आयात करणार याबद्दल फारसे ठोस आश्वासन चीनने दिलेले नाही पण हे मात्र निक्षून सांगितले की अमेरिका चीन संबंधात तैवान ही रेड लाईन असेल. अमेरिकेने ती क्रॉस करायचा प्रयत्न केला तर इतर क्षेत्रातील संबंधांवर विपरीत परिणाम होतील

आपल्यासाठी/इतर जगासाठी : होर्मूझचा तिढा सुटलेला नाही. चीन भेटीनंतर इराणच्या बाबतीत ट्रम्प अजून झुकू लागले आहेत असे संकेत आहेत. पुन्हा एकदा आशा करणे एवढेच हातात आहे. जगासाठी/भारतासाठी तेल/वायू तंगी काही काळ तरी सुरूच राहील असे दिसते अमेरिका आणि चीनमधील संबंध बहुआयामी आहेत. ट्रम्प म्हणजे अमेरिका नव्हे. ट्रम्पनंतर अमेरिकन प्रस्थापित व्यवस्था चीन बरोबर आणि इतर अनेक क्षेत्रात, विशेषतः तैवान प्रश्नावर कशी वागेल हे काळच ठरवेल भारतासाठी चीन फक्त जगातील अजून एक देश नाही. बराच काही आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ऋषिकेशमध्ये मोठा रेल्वे अपघात टळला! उज्जयनी एक्सप्रेसचे ३ डब्बे रुळावरून घसरले

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**ऋषिकेश –** उत्तराखंडमधील ऋषिकेश येथे एक मोठा रेल्वे अपघात झाला आहे. सोमवारी रात्री सुमारे साडेनऊ वाजता योगनगरीत ऋषिकेश स्थानकावर उज्जयनी एक्सप्रेस रुळावरून घसरली असून ट्रेनचे तीन डबे रुळावरून घसरले.




हा अपघात इतका भीषण होता की, एक डबा पूर्णपणे रुळावरून घसरून, उलटला आणि सुमारे २० फूट रुळांवर लटकला. रुळावरून घसरलेल्या ट्रेनची भयानक छायाचित्रेही आता समोर आली आहेत. यात देखभाल दुरुस्तीचे काम सुरू असताना ट्रेन क्रमांक १४३११७ उज्जैनी एक्सप्रेसशी उज्जयनी एक्सप्रेसचे तीन डबे रुळावरून घसरून उलटले. सुदैवाने, यार्डमध्ये रुळ बदलले जात असताना आणि ट्रेन रिकामी असताना हा अपघात घडल्याने एक मोठी दुर्घटना टळलीय. सध्या रेल्वेने या संदर्भात चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक तपासानुसार, नियमित देखभालीदरम्यान ट्रेनचे ब्रेक निकामी झाले होते. ही ट्रेन आज (१९ मे) सकाळी सुमारे ६ वाजता सुटणार होती. काल रात्री, सुमारे ९.२३ वाजता, स्टेशन यार्डमध्ये ट्रेनचा ट्रॅक बदलला जात होता. यावेळी हा अपघात घडला. अपघाताच्या वेळी ट्रेनमध्ये फक्त लोको पायलट उपस्थित होता. अपघातानंतर रुळांवर मोठी गर्दी जमली होती. जीआरपीच्या जवानांनी परिस्थितीचा ताबा घेतला आणि लोकांना घटनास्थळावरून हटवले. रेल्वे विभागाने चौकशी सुरू केली आहे. मात्र ट्रेनच्या संचालनाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. वरिष्ठ रेल्वे अधिकारी अडीच तास घटनास्थळी पोहोचले नाहीत, असा आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या रेल्वे अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत. रुळांवरून खराब झालेले डबे हटवण्याचे काम सध्या सुरू आहे. रेल्वे स्थानकावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात गाडी रुळावरून घसरल्याची घटना कैद झाली आहे. या अपघातामुळे रेल्वे वाहतुकीवर कोणताही परिणाम झालेला नाही, असे रेल्वेचे म्हणणे आहे.

तीन दिवसांत चार अपघात? हा असा पहिला अपघात नाही. गेल्या काही दिवसांत अनेक रेल्वे अपघात घडले असून, त्यामुळे रेल्वे सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वी काल सकाळी, बिहारहून पाटणाकडे जाणाऱ्या एका पॅसेंजर ट्रेनला सासाराम रेल्वे स्थानकावर आग लागली होती.

रविवार, १७ मे रोजी, पहाटे ५:३० च्या सुमारास आलोट आणि लुनीरिच्छा स्थानकांदरम्यान तिरुवनंतपुरम-हजरत निजामुद्दीन राजधानी एक्सप्रेसच्या बी१ एसी डब्याला अचानक आग लागली. याशिवाय, शुक्रवार, १५ मे रोजी, हैदराबादमधील नामपल्ली रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या हैदराबाद-जयपूर एक्सप्रेसच्या दोन रिकाम्या एसी डब्यांना (बी१ आणि बी२) आग लागली, ज्यात कोणीही जखमी झाले नाही.

# सेव्हनहिल्स रुग्णालय पुन्हा खासगी संस्थेचाच ताब्यात

## भाडेकरार करण्याचा प्रस्ताव सुधार समितीत सादर



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली –** मुंबई महापालिकेच्यावतीने खासगी सहभाग तत्वावर देण्यात आलेले मरोळ येथील रुग्णालय सेव्हनहिल्स व्यवस्थापनाकडून आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न होत असतानाच पुन्हा हे रुग्णालय त्याच संस्थेकडे सोपवण्यात येत आहे.

या सेव्हनहिल्सला हे रुग्णालय देण्याचा ठराव रद्द केल्यानंतर पुन्हा आता त्यात सुधारणा करत ३० अधिक ३० वर्षांकरता भाडेकरार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे २०१३मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून महापालिका व सेव्हन हिल्स हेल्थकेअर व क्रॅप्री ग्लोबल कंपनी याच्यामध्ये नव्याने निवाडा करार करण्यात येत असून याबाबतचा प्रस्ताव आता सुधार समितीपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. धेरी पूर्व मरोळ येथील सर्वे क्रमांक १५५ भाग, १५६ भाग १६२ भाग ते १६८ धारण करणाऱ्या महापालिकेचा भूभागावरील रुग्णालय सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर महापालिकेच्या ७७०५५ चौरस मीटर पैकी ६६,६८७ चौरस मीटर भूभाग त्यावरील इमारती यांच्यसह सेव्हन हिल्स हॉस्पिटल्स लिमिटेड व सोमा इंटरप्रायझेस या संयुक्त कंपनीला रुग्णालय चालवण्यासाठी जसे आहे जेथे आहे तत्वावर प्रथम ३० वर्षांकरता आणि नुतनीकरण करता येईल अशाप्रकारे पुढील ३० वर्षांकरता खासगी सहभाग तत्वावर देण्याचा निर्णय २००४मध्ये घेण्यात आला होता. त्यानंतर सेव्हनहिल्स हॉस्पिटल्स सोबत २००५मध्ये कंत्राट करार आणि सन २०१३मध्ये सामजस्य करार करण्यात आला होता. या कराराचे उल्लंघन झाल्यानंतर २४ जानेवारी २०१८मध्ये कराराचे उल्लंघन झाल्याने त्यांचे करार संपुष्टात आणण्यासाठी महापालिकेच्यावतीने कारणे दाखवा नोटीस बजावली. तत्पूर्वी सन २०१७मध्ये ही कंपनी दिवाळीखोरीत गेली होती. त्यामुळे महापालिकेला दंडात्मक कारवाई करणे शक्य नव्हते.

# पुजेसाठी आलेल्या मित्र-मैत्रिणीची भोंदूबाबाकडून निर्घृण हत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**धुळे –** जिल्ह्यात शनि अमावस्येनिमित्त आश्रमात तांत्रिक विधी करण्यासाठी आलेल्या एका २५ वर्षीय महिलेची आणि तिच्या मित्राची एका भोंदू बाबाने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी योगेश ऊर्फ भैय्या बापू खैरणार या ३३ वर्षीय स्वयंघोषित भोंदूबाबाला अटक केली



असून, त्याने गुन्हा कबूल केला आहे.

कौटुंबिक वाद आणि नोकरीच्या समस्यांमुळे पीडित महिला तिच्या मित्रासह १६ मे रोजी धुळे जिल्ह्यातील जैतने गावातील खैरणार याच्या आश्रमात आली होती, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. खाजगी फायनान्स कंपनीत काम करणाऱ्या या महिलेवर विधी पूर्ण झाल्यानंतर आरोपीने दुचाकीवरून घरी सोडताना जंगलात बलात्काराचा प्रयत्न केला. महिलेने विरोध करून आरडाओरडा केल्यावर आरोपी खैरणार याने कपड्याने तिचा गळा दाबून खून केला आणि मृतदेह रायपूर-भादगाव रस्त्याशेजारी दगड ठेवून लपवून ठेवला.

यानंतर आरोपीने आश्रमात परतत महिलेच्या मित्राची लोखंडी गदा किंवा रॉडने मारून हत्या केली आणि त्याचा मृतदेह बैलगाडीतून नेऊन दोन टेकड्यांच्या दरम्यान फेकून दिला.

# अशोक खरातचा ईडीताबा घेणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक –** लैंगिक अत्याचारातील आरोपी भोंदू अशोक खरात आणि पंतसंस्थेतील आर्थिक व्यवहार प्रकरणातील संशयित नामकर्ण आवारे यांचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे.

सिन्नर सत्र न्यायालायाकडून दोघांना १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावली आहे. दोघांना एकाच वाहनातून न्यायलयात हजर करण्यात आले होते. आवारेंना आधी पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली होती, पुन्हा आवश्यकता नाही असा युक्तिवाद आवारेच्या वकिलांनी न्यायालयात केला होता.

अशोक खरात आणि नामकर्ण आवारे या दोघांची पाच दिवसांची पोलीस कोठडी मागण्यात आली. अखेर न्यायलयाने दोघांना १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावली.

# एनटीएच्या प्रश्नपत्रिका पॅनलमध्येच स्वत:ची माणसं घुसवली

## शिवराज मोटेगावकरचा कट सीबीआय चौकशीत उघड, मुलालाही पेपर दिल्याचा संशय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे –** नीट पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासचे संचालक शिवराज मोटेगावकरने त्यांच्या साथीदारांच्या मदतीने अत्यंत सुनियोजित कट रचल्याची माहिती सीबीआय तपासातून समोर येत आहे.




तपासानुसार, मोटेगावकर यांनी त्यांच्या क्लासमध्ये कार्यरत असलेल्या पी. व्ही. कुलकर्णींची एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर नियुक्ती करून घेतली होती. तसेच मनीषा मांढरेही एनटीए पॅनलवर वर्णी लावण्यात आल्याचे समोर येत आहे. सीबीआयच्या प्राथमिक तपासानुसार कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायॉलॉजीच्या प्रश्नपत्रिका फोडणार आणि मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार अशी सोय करण्यात आली असा संशय तपास यंत्रणांना आहे. मोटेगावकर यांनी त्यांच्या आर्थिक ताकदीच्या बळावर हे संपूर्ण नेटवर्क उभे केल्याचा संशय सीबीआयला आहे. दरम्यान, नीट व्यवस्थापनातील आणखी कोणी या प्रकरणात सहभागी आहे का, याचाही तपास सीबीआयकडून केला जात आहे.

मोटेगावकर यांनी त्यांच्या क्लासमध्ये कार्यरत असलेल्या पी. व्ही. कुलकर्णींची एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर नियुक्ती करून घेतली होती. तसेच मनीषा मांढरेही एनटीए पॅनलवर वर्णी लावण्यात आल्याचे समोर येत आहे.

दोघांनी आपापल्या विषयांचा म्हणजेच कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायॉलॉजीच्या प्रश्नपत्रिका फोडणार आणि मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार अशी सोय करण्यात आली. त्यानंतर या पेपरच्या आधारे वाढलेल्या गुणातून तो आपले कौतुक करून घेत होता. त्यातून आपल्या क्लासकडे अनेक विद्यार्थ्यांनी आकर्षित व्हावी असं ते करत होता.

एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर त्याने या दोघांची वर्णी कशी लावली, एनटीएमध्ये त्याचं कोणाशी कनेक्शन आहे का? आणखी कोणाचं यामध्ये कनेक्शन आहे का? याचा तपास केला जात आहे, तपासात अनेक लिंक पुढे जात आहे, मोटेगावकरने आपल्या मुलाला देखील तो पेपर दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. घरात कोणीतरी डॉक्टर असावं का? अशी त्याची तयारी होती का? या अनुषंगाने तपास सुरू आहेत. सीबीआयकडून सर्व अंगाने तपास सुरू आहे.

# पेट्रोलचे दर १२० ते १३० रुपयांवर जातील

## राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्याकडून धोक्याची घंटा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सांगली –** सांगली : आज ९६ रुपयाला मिळणारा अमेरिकन डॉलर महिन्याभरात १०० रुपयांवर जाईल. तर, महिनाभरात पेट्रोल १२० ते १३० रुपयावर जाईल, अशी धोक्याची घंटाच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी वाजवली आहे. ईश्वरपूरमध्ये शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांच्या अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्यात जयंत पाटील बोलत होते.

ते म्हणाले की, कोरोनाच्या वेळी एकदा लॉकडाऊन झाला होता, आता आपोआपच लॉकडाऊन होईल



अशी परिस्थिती आहे भविष्यातील अडचणी आणि धोके सांगितले आहेत.

ते म्हणाले की, देशाच्या गृहमंत्र्यांनी १५ दिवसापूर्वीच आपल्याकडे सहा महिने पुरेल इतका पेट्रोल डिझेलचा साठा आहे, असं सांगितलं होतं. त्याला अजून महिना झाला नाही, तोवर देशाच्या पंतप्रधानानी खर्च कमी करण्याच्या सूचना देशवासियांना केल्या. अशाच पद्धतीची भूमिका २०१३ मध्ये आर्थिक परिस्थिती बिकट आल्यामुळे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी घेतली होती. त्यावेळी आत्ताच्या मुख्यमंत्र्यांनी देशाची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली आहे, अशा पद्धतीचा ट्विट केलं होतं. मात्र, तेच मुख्यमंत्री आज पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाची थट्टा करू नका, असे ट्विट करता आहेत, असे म्हणत जयंत पाटलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही लक्ष्य केले.

# सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटींचा निधी मंजूर : तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समिती बैठकीत निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई –** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटी ७२ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला.



यामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असून भाविक, पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत. तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार आणि कालमर्यादेत पूर्ण करण्याचे तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासासाठी १७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या विकास आराखड्यांतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. वाहतूककोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत.

सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आदी योजना हाती घेण्याची सूचना फडणवीस यांनी बैठकीत केली. दरम्यान, संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी ४१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अगरवाल उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी २१०.४५ कोटी प्रस्तावित करण्यात आले असून यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे.

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे.

श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण केली जाणार आहेत.

अजिंक्यतारासाठी १३४ कोटी सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रुपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग आणि लँडस्केपिंग, राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरुजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे, अत्याधुनिक लटकता पूल, स्वच्छता आणि विश्रांतीगृहांची कामे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पार पाडावीत, असे फडणवीस यांनी सांगितले.

# वांद्रे येथील 'गरीब नगर'मध्ये अनधिकृत बांधकामांवर हातोडा!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ५ दिवसीय महा-पाडकाम मोहिमेला सुरुवात



**मुंबई** – मुंबईतील वांद्रे पूर्व भागात असलेल्या 'गरीब नगर' झोपडपट्टी परिसरात आज, मंगळवार, १९ मे पासून अनधिकृत बांधकामांविरुद्ध एक भव्य पाडकाम मोहीम हाती घेण्यात आली आहे. पश्चिम रेल्वेच्या मालकीच्या जागेवर उभी राहिलेली बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्यासाठी सलग पाच दिवस ही धडक कारवाई चालणार आहे. १९ मे ते २३ मे या कालावधीत चालणाऱ्या या व्यापक मोहिमेला मुंबई उच्च न्यायालयाने हिरवा कंदील दिल्यानंतरच पश्चिम रेल्वेने हे अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. या कारवाईची कायदेशीर पार्श्वभूमी पाहिल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने ६ मे रोजी झालेल्या एका महत्त्वपूर्ण सुनावणीत पश्चिम रेल्वे प्रशासनाला ही पाडकाम मोहीम पुढे नेण्याची रीतसर परवानगी दिली होती. मात्र, अतिक्रमण हटवताना न्यायालयाने माणुसकीच्या दृष्टिकोनातून एक अतिशय महत्त्वाची अटही प्रशासनावर घातली आहे. २०२१ मध्ये प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या अधिकृत सर्वेक्षणात जे झोपडपट्टीधारक 'पात्र' ठरले आहेत, त्यांच्या राहत्या घरांचे आणि अधिकारांचे संरक्षण करणे प्रशासनावर बंधनकारक असणार आहे.

# कमरेला बिसलरीची रिकामी बाटली

(प्रतिनिधी वरूड दर्पण)





***बीड*** – जिल्ह्यातील अंबाजोगाई येथून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे भुलतज्ज्ञ विभागाचे प्रमुख डॉक्टर अभिमन्यू तरकसे यांचा आज सकाळी तलावात पोहताना बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. अंबाजोगाई शहरालगत असलेल्या 'काळवीट साठवण तलावात' सकाळी ६:३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. एका वरिष्ठ डॉक्टरांच्या अशा अचानक जाण्याने संपूर्ण अंबाजोगाई शहर आणि वैद्यकीय क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डॉ.अभिमन्यू तरकसे हे गेल्या अनेक वर्षांपासून नित्यनेमाने अंबाजोगाई शहरालगत असलेल्या काळवीट साठवण तलावात पोहण्यासाठी जात असत. ते एक उत्तम पोहणारे म्हणूनही परिचित होते. आज सकाळी नेहमीप्रमाणे ते एकटेच तलावावर पोहण्यासाठी गेले. पाण्यात उतरण्यापूर्वी त्यांनी सुरक्षिततेचा उपाय म्हणून आपल्या कमरेला रिकाम्या प्लास्टिकच्या बाटल्या देखील बांधल्या होत्या, जेणेकरून पाण्यात समतोल राखता येईल. मात्र, पाण्यात उतरल्यानंतर नेमके काय घडले, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही.

# महात्मा फुले द्विशताब्दी जयंतीनिमित्त महाराष्ट्रभर फिरणार विशेष चित्ररथ

**वरुड येथे १८ व मोर्शी येथे १९ मे रोजी आगमन**

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**वरुड** – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त राज्यभर विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य विशेष चित्ररथ महाराष्ट्रभर फिरविण्यात येत आहे.

हा चित्ररथ समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली माजी खासदार समीर भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आला आहे. ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत हा चित्ररथ राज्यातील गावोगावी व शहरा-शहरांत फिरून समाजप्रबोधनाचे कार्य करणार आहे.

चित्ररथामध्ये सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांसह महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा विशेष आकर्षण ठरत आहे. तसेच महात्मा फुले लिखित पुस्तक, पेन यांसारख्या ज्ञानाच्या प्रतीकांची प्रभावी मांडणी करण्यात आली असून पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाड्याची प्रतिकृतीदेखील चित्ररथात साकारण्यात आली आहे.

समता, बंधुता, न्याय आणि शिक्षणाचा संदेश देणारा हा चित्ररथ ज्या शहरात पोहोचतो, त्या ठिकाणी महामानवांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले जाते. तसेच सामाजिक एकात्मता आणि जागृतीचा संदेश देण्यात येत आहे. या उपक्रमाला शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचारांच्या नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून चित्ररथाचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.

या चित्ररथाचे वरुड येथे १८ तारखेला आगमन होऊन मुक्काम राहणार असून दुसऱ्या दिवशी १९ मे रोजी जरुड, बेनोडा, हिवरखेड मार्गे मोर्शी येथे येऊन लेहेगाव मार्गे अमरावती करिता प्रस्थान होईल.

या निमित्ताने सर्व जिल्हाध्यक्ष, महानगराध्यक्ष व तालुकाध्यक्ष तसेच फुले, शाहू, आंबेडकर विचारप्रेमींनी चित्ररथाचे उत्साहात स्वागत करावे, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पोवाड्यांचे आयोजन करावे, रांगोळ्या काढाव्यात तसेच लेझीम, ढोल पथकांसह रॅलीचे आयोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच गावागावांत मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येतील अशा ठिकाणी महात्मा फुले यांच्या विचारांचे प्रबोधन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले. महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात येणारा हा चित्ररथ उपक्रम समाजात समतेची जाणीव अधिक दृढ करून नवचैतन्य निर्माण करणारा ठरत आहे.

याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद जिल्हाध्यक्ष नंदकिशोर लेकुरवाडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस प्रा.डॉ.सुमित पवार, कार्याध्यक्ष नितीन राऊत, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सोनाली नवले, मोर्शी न.प.माजी उपाध्यक्ष मोहन मडघे, समता परिषद प्रसिद्धी प्रमुख अंबादास सिनकर यांनी केले आहे.

**नोकरी**

मिहान, ऑफिस, बँकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय – १८ ते ३५

पगार – १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६ ७८८८०६९४५५

# स्थानिक नागरिकांच्या सूचना आणि संकल्पना लक्षात घेऊन उद्यानांचा विकास करा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## एन विभागातील उद्यान कामांचा महापौर रितू तावडे यांनी घेतला आढावा



**मुंबई** – मुंबईतील उद्याने ही मुंबईकरांच्या विश्रांतीची, मनोरंजनाची हक्काची ठिकाणे आहेत. चालणे, धावणे, व्यायाम, योगा आदींच्या माध्यमातून उद्याने, मैदाने ही सार्वजनिक आरोग्यासाठी महत्त्वाची आहेत. त्यादिशेने प्रशासनाने पावले उचलावीत. सर्व नगरसेवकांनी देखील आपापल्या परिसरातील उद्याने, मैदाने यांच्या विकासामध्ये लोकसहभाग रहावा, यासाठी प्रयत्न करावेत, असे उद्गार मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी काढले. घाटकोपर एन विभागातील उद्याने विकासाच्या संकल्पना आणि आराखडे तयार करून लवकरात लवकर सादर करावेत, असे निर्देशही महापौर तावडे यांनी दिले आहेत. घाटकोपर मधील राजावाडी उद्यान, लायन्स पार्क, केशरवाला उद्यान, क्लोव्हर मैदान, चित्तरंजन नगर मैदान, ९० फूट मार्गावरील आर. जी. उद्यान, प्रमोद महाजन उद्यान आणि जॉगर्स पार्क, डॉ.हेडगेवार उद्यान आणि नाना – नानी पार्क यांचा विकास करण्यासंदर्भात आयोजित या बैठकीस उपआयुक्त अजितकुमार आंबी, उपआयुक्त संतोषकुमार धोंडे, एन विभागाचे सहायक आयुक्त मारुती पवार, उपप्रमुख वास्तुशास्त्रज्ञ अनघा कुडाळकर, कार्यकारी अभियंता बी. टी. सावंत यांच्यासह संबंधित अधिकारी तसेच स्थानिक नागरिक व्यवस्थापनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४८/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती शारदा गजाननराव साळीवकर, वय अं.६८ वर्ष, धंदा-घरकाम, २) चंदन गजाननराव साळीवकर, वय अं.४४ वर्ष, धंदा- नोकरी, ३) सौ.सारीका ऊमेश भातकुलकर, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.३ रा.आष्टी, ता.आष्टी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे गजानन लक्ष्मण साळीवकर उर्फ सावळीकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४६/२०२६** **ने.ता.०८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुशिलाबाई संतोषराव कोळेकर, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम, २) जगदिश संतोषराव कोळेकर, वय अं.५४ वर्ष, धंदा- मजुरी, ३) ओंकार संतोषराव कोळेकर, वय अं.५१ वर्ष, धंदा- मजुरी, अर्लदार क्र.१ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.२ रा.भंडारा, क्र.३ रा.नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे संतोष देवराव कोळकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५०/२०२६** **ने.ता.१७/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कमलाबाई मोतीरामजी इघे, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम, २) दिपक मोतीराम इघे, वय अं.५५ वर्ष, धंदा- मजुरी, ३) प्रदिप मोतीरामजी इघे, वय अं.४९ वर्ष, धंदा- मजुरी, ४) सौ ज्योती प्रदिप कालमेघ, वय अं.५२ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ व ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.४ रा.गौरखेडा, ता.अचलपुर, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे मोतीराम तुकारामजी इघे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१७/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४७/२०२६** **ने.ता.१७/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) छाया भागवत खोंडेकर, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, २) पद्मा वामनराव पांढुरकर, वय अं.६२ वर्ष, धंदा-घरकाम, ३) अनिल तुकाराम राऊत, वय अं.५९ वर्ष, धंदा-मजुरी, अर्जदार क्र.१ व २ रा.नागपूर, ता.जि.नागपूर, क्र.३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे अनुसय्या तुकारामजी राऊत, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१७/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# विदर्भात आज उन्हाचा 'रुद्रावतार': चार जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - विदर्भात उन्हाचा चटका प्रचंड वाढला असून उष्णतेची लाट आणखी तीव्र झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत असून, विदर्भातील तीन जिल्ह्यांनी तापमानाची सर्वोच्च पातळी ओलांडली आहे. काल (१८ मे) वर्धा येथे सर्वाधिक ४६.५ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली. या वाढत्या उष्णतेमुळे नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यांसाठी पुढील चार दिवस (२१ मे पर्यंत) उष्णतेच्या तीव्र लाटेचा 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पारा ४५ अंश सेल्सिअसच्या वर गेला आहे. अकोला आणि अमरावती पाठोपाठ आता वर्धा शहर देखील देशातील सर्वाधिक उष्ण शहरांच्या यादीत आले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांत हा पारा ४७ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची भीती वर्तवली जात आहे.

विदर्भात काल सर्वाधिक तापमान वर्धा येथे ४६.५ अंश सेल्सिअस, अमरावती ४६.४, अकोला ४६.३, यवतमाळ ४५.४ व नागपूर ४४.४ नोंदविले गेले. बुलढाणा ४३.६ अंश, चंद्रपूर ४३.८ अंश, गडचिरोली ४३.६, गोंदिया ४३.८, नागपूर ४४.४, वाशिममध्ये ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

हवामान खात्याचा नागरिकांना सल्ला पुढील काही दिवस कमाल तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही. त्यामुळे नागरिकांनी दुपारी १२ ते ३ या वेळेत अत्यंत आवश्यक काम नसल्यास घराबाहेर पडणे टाळावे. बाहेर पडताना हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावेत. शरीरात पाण्याची कमतरता भासू नये म्हणून ओआरएस, ताक, लिंबूपाणी, आणि भरपूर पाणी पिऊन शरीर हायड्रेट ठेवावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मान्सूनने अंदमान-निकोबार बेट व्यापले

दरम्यान, एकीकडे विदर्भ उन्हाने होरपळत असतानाच दुसरीकडे देशातील सर्वसामान्य आणि शेतकरी बांधवांसाठी अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. वर्ष २०२६ च्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी भारताकडे आपली वाटचाल कमालीची गतिमान केली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १८ मे रोजी मोसमी वाऱ्यांनी आग्नेय अरबी समुद्र, कोमोरीन भाग आणि नैऋत्य-आग्नेय बंगालच्या उपसागराच्या अनेक भागांत यशस्वी प्रगती केली आहे.

# थकीत मेंटेनन्सच्या पैशांची वसुली अनेक वर्षांनंतरही केली जाऊ शकते!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** -सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांचे थकीत मेंटेनन्स शुल्क हे सतत राहणारे दायित्व आहे. अनेक वर्षांनंतरही मेंटेनन्सच्या शुल्काची कायदेशीर वसुली केली जाऊ शकते, असा निवाळ्ळा उच्च न्यायालयाने देत ठाण्यातील दोन ज्येष्ठ नागरिकांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. यामुळे वर्षानुवर्षे मेंटेनन्स शुल्क न भरणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याचा सोसायट्यांचा मार्ग मोकळा झाला. ठाण्यातील ज्येष्ठांनी मेंटेनन्स वसुलीच्या कारवाईला आव्हान दिले होते.

मेंटेनन्सची थकबाकी देण्यास नकार याचिकाकर्ते रहिवासी १९९६ पासून नोंदणीकृत न केलेल्या विकास कराराच्या आधारे संबंधित फ्लॅटमध्ये राहत होते. त्यांनी थकीत मेंटेनन्सची रक्कम भरण्यास नकार दिला होता. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी सविस्तर सुनावणी घेतली आणि निर्णय दिला. सुविधा घेत असाल तर मेंटेनन्स भरावाच लागेल! महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम १५४बी-२९ अंतर्गत सोसायट्यांच्या थकबाकी वसुलीसाठी विशेष यंत्रणा आहे. यासाठी सामान्य कालमर्यादेचे नियम लागू होत नाहीत.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

### नवरीच्या दारात पोहोचण्याआधीच वऱ्हाडावर मृत्यूचा घाला!

# पालघरमध्ये ट्रक-कंटेनरच्या भीषण धडकेत दुचाकीही चिरडली : १३ ठार, अनेक जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पालघर** - मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू तालुक्यातील धानीवरी येथे सोमवारी (१८ मे) सायंकाळी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास साखरपुड्यासाठी निघालेल्या वऱ्हाडाच्या आयशर ट्रकचा भीषण अपघात झाला. आयशर ट्रक आणि कंटेनर यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत एक दुचाकीही चिरडली गेली. या भीषण दुर्घटनेत तब्बल १३ जणांचा मृत्यू झाला असून ३० ते ३५ जण जखमी झाले आहेत.

डहाणू तालुक्यातील बापुगाव येथील लाखातपाडा परिसरातील जयराम दांडेकर यांच्या कुटुंबातील साखरपुड्याचे वऱ्हाड आयशर ट्रकमधून धानीवरी खडकीपाडा येथे जात होते. ट्रकमध्ये ५० हून अधिक नागरिक प्रवास करत असल्याचे सांगितले जात आहे. नवरीच्या घराजवळ पोहोचण्यापूर्वीच धानिवरी परिसरात समोरून येणाऱ्या कंटेनरची आयशर ट्रकला जोरदार धडक बसली.

हा अपघात इतका भीषण होता की, महामार्गावरून जाणाऱ्या एका दुचाकीलाही या वाहनांनी चिरडले. या अपघातात दुचाकीवरील दोन प्रवाशांसह ट्रक मधील १० अशा १२ जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर बराच काळ अनेक प्रवासी ट्रकमध्ये अडकून पडले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना बाहेर काढून कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी वेदांत, सिल्वासा आणि वापी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येक मृत व्यक्तीमागे पाच लाख रुपये देण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

मृतांची नावे अशी आहेत- सुरेश रत्ना लाखात, पांडू गणपत लाखात, कल्लू गोविंद लाखात,सुनील अर्जुन दांडेकर, चित्रा गोविंद कुर्हाडा, नमिता विठ्ठल दांडेकर,सारिका संतोष लाखात, आयुष सिताराम लाखात, सागर नामदेव शेंडे, वंदनाशिवराम वळवी, सलोनी शिवराम वळवी, अजय आहाडी, रियांशु संतोष लाखात.या भीषण दुर्घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करत आहेत.

कंटेनरखाली दबले वऱ्हाडी, दुचाकीवरील दोघेही ठार प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, धडक एवढी भीषण होती की कंटेनरचा पुढचा केबिनचा भाग मुख्य बॉडीपासून वेगळा झाला आणि तो थेट वऱ्हाडाच्या आयशर ट्रकवर जाऊन कोसळला.

# शक्तीपीठ महामार्गाच्या बैठकीत शेतकरी रणजितसिंह मोहिते पाटलांना : 'देवाभाऊपुढे कोणाचंच काही चालत नाही'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - शक्तीपीठ महामार्गाची नवीन अलाइनमेंट माळिशरस तालुक्यातून गेल्यानंतर आता या भागातील राजकीय आणि सामाजिक हालचालींना वेग आला आहे.

या महामार्गाच्या पार्श्वभूमीवर माळिशरस तालुक्यातील शेतकऱ्यांची भूमिका जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत अकलूज येथे नुकतीच एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत विकासकामांवरून होणारे गैरसमज दूर करतानाच, एका शेतकऱ्याने थेट 'देवाभाऊपुढे कोणाचंच काही चालत नाही', असे विधान केल्याने बैठकीत एकच हशा पिकला.

अकलूज येथील या बैठकीत माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. शक्तीपीठ महामार्गासारख्या मोठ्या विकासकामांबद्दल समाजात आणि शेतकऱ्यांमध्ये अनेक प्रकारचे गैरसमज पसरवले जात आहेत, ते आधी समजून घेतले पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. महामार्गामुळे होणारा विकास आणि जमिनींचा मोबदला यावर चर्चा सुरू असतानाच, बैठकीत उपस्थित असलेल्या एका शेतकऱ्याने उभे राहून थेट मनातील खंत आणि वास्तव बोलून दाखवले.

